अस्सल सोलापुरी


# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २७ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २३७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## गुजरातने केले पॅकअप, आता चेन्नईसोबत फायनल थरार



शुभमन गिल
धावा : १२९
चेंडू : ६०
चौकार : ०७
षटकार : १०

अहमदाबाद : मोहित शर्मा आणि मोहम्मद शमीच्या भेदक माऱ्यापुढे मुंबईच्या फलंदाजांनी लोटांगण घातले. मोहित शर्मा याच्या पाच विकेटच्या बळावर गुजरातने मुंबईचा ६२ धावांनी पराभव केला. गुजरातने दिलेल्या २३४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईचा संघ १८.२ षटकात १७१ धावांवर गारद झाला. मुंबईकडून एकट्या सूर्यकुमार यादवने झुंज दिली. मोहित शर्मा याने मुंबईचा अर्धा संघ तंबूत पाठवला. प्रथम फलंदाजी करताना शुभमन गिल याने शतकी खेळी केली. २८ मे रोजी गुजरात आणि चेन्नई यांच्यामध्ये फायनलचा थरार रंगणार आहे. आघाडीचे फलंदाज झटपट बाद झाल्यानंतर सूर्यकुमार यादव याने एकाकी झुंज केली. सूर्यकुमार यादव याने ३८ चेंडूत ६१ धावांची खेळी केली. या खेळीत सुर्याने दोन षटकार आणि सात चौकार लगावले. सूर्यकुमार यादव याने झंझावाती फलंदाजी करत मुंबईच्या विजयासाठी सर्वस्वी प्रयत्न केले. सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी २२ चेंडूत ५१ धावांची भागिदारी केली. तर सूर्यकुमार यादव आणि कॅमरुन ग्रीन यांनी ३२ चेंडूत ५१ धावांची भागिदारी केली. सूर्यकुमार यादव आणि विनोद यांच्यामध्ये १९ चेंडूत ३१ धावांची भागिदारी केली.



# आघाडीचा ‘फॉर्म्युला’ अन् युतीचे ‘भिजत घोंगडे’

## लोकसभा जागांची खेचाखेची



सुराज्य/मुंबई

**आगामी लोकसभा निवडणुकीतील जागावाटपाच्या मुद्द्यावरुन महाविकास आघाडीत १६-१६-१६ हा फॉर्म्युला ठरत असला तरी ठाकरे गटाने २३ जागांवर दावा केल्याने आघाडीत त्यांचा ‘ फॉर्म्युला’ बिघडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तर इकडे भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) युतीमध्ये जागा वाटपावरून ठिणगी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण, एकनाथ शिंदे यांच्याकडून आगामी लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेनेने २०१९ मध्ये लढवलेल्या २३ पैकी २२ जागांवर दावा केला आहे. यावर पक्षविस्ताराच्या बाबतीत कायम आक्रमक असलेला भाजप पक्ष काय भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. शिंदे गटाला २२ जागा दिल्या तर ‘भाजपचे मिशन ४५’ चे काय?, हा प्रश्न भाजप नेत्यांना सतावत आहे. त्यामुळे युतीचे ‘घोंगड’ भिजतच पडलंय.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी सर्व खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीत लोकसभेच्या जागांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत त्यांनी म्हटले की, ‘लोकसभेच्या २२ जागा लढवण्यासंदर्भात चर्चा केली आहे. यापैकी १३ खासदार हे सध्या शिवसेनेसोबत (शिंदे गट) आहेत. तर उर्वरित खासदार ठाकरे गटासोबत असून या जागांचा आढावा घेतला जाईल. यानंतर त्याठिकाणी उमेदवार उतरवण्याच्या दृष्टीने तयारी केली जाईल.

लोकसभेच्या या २२ जागांवर आमचा नैसर्गिकपणे हक्क असल्याचे वक्तव्य शिंदे गटाच्या नेत्यांनी केले.’ तसेच खासदारांसोबत झालेल्या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी १३ विद्यमान खासदारांसोबत चर्चा केली. या जागा पुन्हा जिंकण्यासाठी काय करावे लागेल, यावर चर्चा झाली. लोकसभेच्या या १३ जागांसंदर्भात रणनीती ठरवण्यासाठी संबंधित मतदारसंघांमधील भाजप आणि शिंदे गटाच्या स्थानिक नेत्यांची बैठक होईल, असेही सांगण्यात आले. तसेच मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून या सर्व लोकसभा मतदारसंघातील विकास राजकारण्यांचा ‘मेंदू’ कुठे गेलायं?

भाजप आणि शिवसेना यांनी २०१९ साली युतीमध्ये निवडणूक लढवली होती. त्यावेळी भाजप-शिवसेनेने महाराष्ट्रातील ४८ पैकी ४१ जागांवर विजय मिळवला होता. त्यावेळी भाजपने २५ जागा लढवून २३ जागांवर विजय मिळवला होता. तर शिवसेनेने २३ जागा लढवल्या होत्या, त्यापैकी १८ जागांवर शिवसेनेचे खासदार निवडून आले. तर काँग्रेस आणि राष्ट्रवादीने लोकसभेच्या अनुक्रमे २५ आणि १९ जागा लढवल्या होत्या. तर चार जागांवर घटकपक्षाचे उमेदवार उभे होते.

दरम्यान महाविकास आघाडीत ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या तीन पक्षात समसमान जागावाटपावर चर्चा होत असली तरी ते ठाकरे गटाला मान्य नाही. त्यांनी २३ जागांवर दावा केला आहे. यात महाविकास आघाडीत धुसफुस होण्याची शक्यता आहे. दरम्यान येत्या २ व ३ जूनला काँग्रेस राज्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय मुंबई आढावा घेणार आहे.

### सापत्नाची वागणूक : किर्तीकर



भाजपकडून शिंदे गटाच्या खासदारांना सापत्न वागणूक मिळत असल्याचे खळबळजनक वक्तव्य खासदार गजानन कीर्तिकर यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात भाजप-शिवसेनेच्या (शिंदे गट) युतीच्या भवितव्याबाबत चर्चा सुरू झाली होती. मात्र, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी अहमदनगरमध्ये विकासकामांच्या उद्घाटनासाठी आले होते. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

### किर्तीकर असे बोललेच नाहीत : फडणवीस

‘शिवसेना (शिंदे गट) खासदार गजानन कीर्तिकर यांनी भाजपाबद्दल केलेल्या दाव्याने राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा (एनडीए) घटक पक्ष आहोत. तरीही, भाजपाकडून आम्हाला सापत्न वागणूक मिळत आहे, असं वक्तव्य गजानन कीर्तिकरांनी केलं आहे. यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोजक्या शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी (२६ मे) अहमदनगरमध्ये विकासकामांच्या उद्घाटनासाठी आले होते. तेव्हा गजानन कीर्तिकरांनी केलेल्या विधानाबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर फडणवीसांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. गजानन कीर्तिकरांनी असं कुठेही म्हटलं नाही. या सर्व कल्पोकल्पीत बातम्या आहेत’, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## हातभट्ट्यांवर धाडी; दारू पिणारे अटकेत

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या माळशिरस पथकाने गुरुवारी माळशिरस तालुक्यातील इस्लामपूर गावाच्या हद्दीतील दोन ढाब्यांवर टाकलेल्या छाप्यात २ हॉटेल चालकांसह सात मद्यपी ग्राहकांना अटक करून गुन्हे नोंदविले आहेत.

पथकाने माळशिरस तालुक्यातील इस्लामपूर गावच्या हद्दीत हॉटेल जयभवानी या ढाब्यावर धाड टाकली असता त्या ठिकाणी हॉटेल मालक नवनाथ श्रीरंग रणनवरे हा ग्राहकांना मद्य पिण्याची व्यवस्था उपलब्ध करून देत असल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी धाब्याच्या समोरील काऊंटरमध्ये देशी विदेशी मद्याच्या सीलबंद बाटल्या आढळून आल्या तसेच त्या ठिकाणी चार ग्राहक सोमनाथ पंढरीनाथ पवार, सचिन बाळासो पवार (दोघेही रा. इस्लामपूर), नाथा आप्पा नरुटे (रा. जळभावी) व रंगनाथ गोरख जाधव (रा. कण्हेर) हे इसम मद्य पिताना आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या एका कारवाईत पथकाने इस्लामपूर येथील हॉटेल सत्कार ढाब्यावर छापा टाकून हॉटेल मालक संजय पांडुरंग पवार व मद्यपी ग्राहक नामदेव महादेव कुंभार (रा. घागरगाव, बिजवडी ता. इंदापूर जि. पुणे), रोहित बबन मिसाळ व भारत भिमराव काळे (दोघेही रा. कण्हेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही गुन्ह्यांचे तपास अधिकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास पूर्ण करून शुक्रवारी गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी माळशिरस आलोक देशपांडे यांनी हॉटेल चालकाला प्रत्येकी पंचवीस हजार रुपये दंड व ग्राहकांना प्रत्येकी एक हजार रुपये दंड असा एकूण ५७ हजारांचा दंड ठोठावला.

## रस्ता ओलांडताना दुचाकीच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

रस्ता ओलांडताना दुचाकीस्वाराने धडक दिल्याने जखमी झालेल्या ६५ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान शुक्रवारी मृत्यू झाला.ही घटना १६ मे रोजी रात्री ९ च्या सुमारास साईलॉन्ससमोरील रस्त्यावर घडली होती.सरस्वती चंद्रकांत मोरे (वय ६५, रा.जुनी लक्ष्मी चाळ, सोलापूर) असे मृत महिलेचे नाव आहे.

सरस्वती आणि लातूर येथील मारुती रंगनाथ ठाकूर (वय-५५) हे १६ मे रोजी रात्री ९ च्या सुमारास रस्ता ओलांडत होते. त्यावेळी अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिली. त्यामध्ये डावा हात,पाय व डोक्याच्या उजव्या बाजूला मार लागून सरस्वती जखमी झाल्या होत्या.

दरम्यान मारुती यांचा या अपघातानंतर अचानक ब्लड प्रेशर वाढला होता.दोघांना रुग्णवाहिकेतून उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.त्यावेळी दोघेही शुद्धीवर होते.शुक्रवार २६ रोजी उपचारादरम्यान सरस्वती मृत पावल्या.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## महाराष्ट्रासाठी गूड न्यूज; मान्सून वेळेत दाखल होणार

### एल निनोचा धोका असतानाही असा बरसणार पाऊस

सुराज्य/सोलापूर



वैशाखवणव्यातव्याकुळलेला सारा महाराष्ट्र ढगाकडे डोळे लावून बसला आहे. शेतकरी बांधवांसह मराठी माणसाला प्रतीक्षा लागून आहे,मान्सूनची. वाट पाहणाऱ्या बळीराजासाठी एक आनंदाची बातमी आहे. यंदा मान्सून उशिराने दाखल होणार, असा अंदाज काही दिवसांपूर्वी वर्तवलेल्या भारतीय हवामान खात्याने शुक्रवारी वेगळीच बातमी दिली. मान्सून वेळेत दाखल होईल असा नवा अंदाज खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. इतकेच नाहीतर यंदा देशावर एल निनोचा धोका असणार आहे. पण तरी मान्सून दिलासादायक असेल, अशी माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनचा एकदा का जोर वाढला तर ४ जूनच्या आसपासच मान्सून केरळमध्ये दाखल होईल. पण १ जूनआधी मान्सूनच्या आगमनाची शक्यता कमी आहे. या वर्षीचा मान्सूनचा पाऊस दीर्घ कालावधीच्या सरासरीच्या ४७ च्या मॉडेल त्रुटीसह ९६ टक्के असण्याची शक्यता आहे. यामुळेच यंदाचा मान्सून हा सामान्य राहण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

### हवामान खात्याने दिलेले महत्त्वाचे अपडेट्स

- हवामान खात्याच्या अंदाजानुसार, जूनमध्ये भारतात होणारा पाऊस हा सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.
- जूनमध्ये भारतात दक्षिण द्वीपकल्प, पश्चिम राजस्थान, लडाखमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडू शकतो.
- गेल्या वर्षीच्या तुलनेत २०२३ मध्ये उष्णतेचा तडाखा कमी जाणवला तर मे २०२३ मध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद करण्यात आली आहे.
- पुढच्या काही दिवसांमध्ये हवामानातील बदल आणि वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे उत्तर-पश्चिम आणि मध्य भारतामध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
- नैऋत्य मान्सून अंदमान समुद्र, अंदमान आणि निकोबार बेटे, दक्षिण बंगालच्या उपसागरात पुढे जाण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे ४ जूनच्या आसपास मान्सून केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज आहे.
- सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मान्सूनचा आणि एल निनोचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. पॅसिफिक महासागरावरील एल निनोसाठी २०२४ पर्यंत अनुकूल परिस्थिती कायम राहील अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.
- हवामान खात्याच्या अंदाजानुसार, जून ते सप्टेंबर या काळामध्ये नैऋत्य मान्सून भारतामध्ये सामान्य राहण्याची शक्यता आहे.
- दरम्यान, यंदा वायव्य भारतामध्ये कमी पावसाचा अंदाज आहे. तर प्रायद्वीप भारतावर अधिक पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.
- हवामान खात्याच्या माहितीनुसार, वायव्य भारतात LP- च्या ९२% पेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## तुझ्यामुळे बायको लेकरे सोडून गेले म्हणत सख्या भावास मारहाण

सोलापूर : मला दारू पिण्यासाठी पैसे दे माझी बायको लेकरं हे तुझ्यामुळेच मला सोडून गेले आहेत. असे म्हणत हातातील काठीने सख्या भावाच्या डोक्यात मारून शिवीगाळ करत गळ्यातील चैन जबरदस्तीने तोडल्याप्रकरणी सख्या भावाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी प्रकाश मल्लप्पा गायकवाड (वय-३८,रा.विजय देशमुख नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सिद्धू मल्लाप्पा गायकवाड (रा.विजय देशमुख नगर,विजापूर रोड) या भावाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २३ मे रोजी रात्रीच्या सुमारास विजय देशमुख नगर विजापूर रोड येथे घडली. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

## प्रस्तावित टोल वसुली प्रक्रिया पुढे ढकला

### भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची गडकरी यांच्याकडे मागणी




सोलापूर : आषाढी वारी असल्याने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ वरील पेनूर (ता. मोहोळ) येथील टोल नाक्यावरील प्रस्तावित टोल वसुली प्रक्रिया पुढे ढकलावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

आषाढी एकादशीनिमित्त २९ जूनला पंढरपूर येथील आषाढी यात्रेत सहभागी होणार आहेत. पंढरपूर यात्रा सुलभीकरणासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागातर्फे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ वरील रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर पेनूर (ता. मोहोळ) येथील टोल नाक्यावरून प्रस्तावित टोल वसुली जून २०२३ पासून सुरू करण्यात येणार असल्याचे समजते. जून महिन्यात असलेली पंढरपूर येथील आषाढी वारी लक्षात घेता पेनूर येथील टोल प्लाजावरील प्रस्तावित टोल वसुली जेणेकरून वारकरी व भाविकांना या महामार्गाचा सुलभतेने वाहतुकीसाठी उपयोग करता येईल. याबाबत आपण संबंधितांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशी मागणी बावनकुळे यांनी पत्राद्वारे केली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सगळे असच म्हणतात !!!

कल्याण
348-56-169

मेन बाजार
678-13-238

## आपत्ती व्यवस्थापनच्या बोटीसह सर्व साहित्य सज्ज ठेवा

- अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. अनिल रामोड यांनी घेतला आढावा
- मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करण्याचे आदेश

सुराज्य/सोलापूर

राज्यात लवकर मान्सून चे आगमन होणार आहे. त्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणांनी मान्सूनपूर्व कामांचे नियोजन करून सर्व कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे बोटीसह सर्व साहित्य सज्ज ठेवा सूचना अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. अनिल रामोड यांनी दिल्या.

पुणे विभागाची मान्सून पूर्व आढावा बैठक विधानभवन येथे अतिरिक्त विभागीय आयुक्त अनिल रामोड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पुणे शहर विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त ए. राजा, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर, विभागीय आयुक्तालयाचे उपायुक्त रामचंद्र शिंदे, पाटबंधारे विभागाचे मुख्य अभियंता हणुमंत गुणाले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ तर दूरदृष्य प्रणालीद्वारे सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सांगली जिल्हा प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

सर्व जिल्ह्यांनी आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा अद्ययावत ठेवावा. महापालिकांनी नालेसफाई पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून घ्यावी. पावसाचे पाणी तुंबणाऱ्या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. धोकादायक इमारतींच्या अनुषंगाने संबंधितांना नोटिसा देऊन रहिवाशांचे स्थलांतर करावे. महावितरणने पावसाच्या काळात वीजपुरवठा विस्कळीत होणार नाही यासाठी दक्षता घ्यावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांचे खड्डे भरण्याचे काम वेळेत पूर्ण करून घ्यावे. धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे. अशा पुलांवरून वाहतूक होणार नाही याकडे लक्ष देण्याच्या सूचना केल्या.



प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, झेडपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, सोलापूर जिल्ह्यांचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा, नदीकाठच्या गावांची यादी, खबरदारीसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे नियोजन, नागरिकांसाठी लाईफ जॅकेटचे किट, आवश्यक साहित्यांची व बोटींची व्यवस्था आदी बाबींची माहिती दिली.

### अन्नधान्य आगाऊ देण्याची व्यवस्था करावी

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सर्व जिल्ह्यांना वितरीत केलेल्या बोटी तसेच इतर साहित्य सुसज्ज ठेवावे. आपत्तीप्रसंगी उपयोगात येऊ शकणाऱ्या जेसीबी, पोक्लेन आदी यंत्रसामग्रीची यादी अद्ययावत ठेवावी. पुर आलेल्या गावातील नागरिकांना आपत्तीच्या काळात आवश्यकता पडल्यास स्थलांतरीत करण्यासाठी पर्यायी निवारा निश्चित करावा. पावसामुळे संपर्क तुटणारी गावे, दुर्गम भागातील गावांना आवश्यकता असल्यास सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे अन्नधान्य आगाऊ देण्याची व्यवस्था करावी.